उपाय –

१) शासन आणि नाट्यपरिषदेने संयुक्तपणे बालनाट्य चळवळीला उत्तेजन देणे.

२) आर्थिक तरतूद करणे आणि सवलतीत थिएटर मिळवून देणे.

३) शाळांचे मुख्याध्यापक, प्रतिनिधी यांच्याशी सल्लामसलत करून बालनाट्याची जोपासना करण्याचे प्रयत्न करणे.

४) बालनाट्य लेखकांकरिता कार्यशाळा घेणे.

५) सबंध महाराष्ट्रभर बालनाट्य चळवळीचा प्रसार करण्याकरिता त्या क्षेत्रातल्या तज्ञांची समिती नेमणे व प्रत्यक्ष कार्यवाही करणे.

६) उद्याच्या रंगभूमीवरचे कलाकार हे बालनाट्यातूनच निर्माण होणार आहेत याचा विचार करून राज्यस्तरीय बालनाट्य स्पर्धांचे आयोजन करणे. ह्या स्पर्धा पुण्यामुंबई पुरत्याच मर्यादित न राहता गावागावातून घेतल्या जाव्यात.

## २) हौशी रंगभूमी / कामगार रंगभूमी

हौस म्हणून नाटकात काम करणारे जे असतात त्यांची रंगभूमी म्हणजे हौशी रंगभूमी. माझ्यावेळी गावागावात अशी अनेक मंडळे होती. बहुतांशी ही मंडळी पूर्वीचे गाजलेले एखादे नाटक रंगमंचावर सादर करायची. मुंबईत त्याला बहुतकरून क्लबची नाटके म्हणतात. नाटक करण्याची जबरदस्त आवड असणारी ही मंडळे, प्रसंगी स्वतःचे पैसे घालून, वेळ खर्च करून, नाटक करण्याची हौस भागवत असतात. विविध कॉलेजच्या गॅदरींगमध्ये आणि गणेशोत्सवात सादर होणारी नाटके, एस्.टी. नाट्य मंडळ किंवा रेल्वे ग्रुप नाटक मंडळी ही खरी हौशी नाट्य मंडळी.

मी मूळची सोलापूरची. जेव्हा मी १५ वर्षांची होते तेव्हा रेल्वेच्या नाट्यमंडळामधून पहिल्यांदा काम केले. तेव्हा जो माझ्या तोंडाला रंगभूमीच्या रंगाचा स्पर्श झाला तो अजूनही तसाच आहे. या रंगभूमीच्या रंगस्पर्शानेच माझ्या आयुष्याला खऱ्या अर्थाने रंगत आणली आहे.

मी नृत्य करायची, गायची पण नाटकातला अभिनय मला नवा होता. सुरूवातीला मला भीती वाटायची, संवाद कसे पाठ करणार याची काळजी वाटायची. पण नंतर रेल्वेतल्या लोकांनी 'ललित कला मंदिर' ही संस्था स्थापन